# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Distressed Persons**

**Police Station** :- **SP Office, Washim**

**Date of Good Work done** :- **22/01/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिमच्या आस्थापनेवर अनुकंपा तत्वावर 15 पोलीस अंमलदार, 03 लिपीकवर्गीय पदावर नियुक्ती दिली त्यांचा स्वागत सोहळा पोलीस अधिक्षक कार्यालय येथे संपन्न झाला.यावेळी SP @IPS_Bachchan यांनी सदर उमेदवारांना शुभेच्छापत्र देऊन स्वागत व मार्गदर्शन केले.

लोकमत

# 'खाकी'चे छत्र हरविलेल्या १८ मुलांच्या अंगावर चढली 'वर्दी'

## अनुकंपातून भरती: जिल्हा पोलीस अधीक्षकांचा पुढाकार!

सुनील काकडे
लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : जिल्हा पोलीस दलात कर्तव्य बजावताना गेल्या काही वर्षांत १८ अंमलदारांचे निधन झाले. कर्ता पुरूषच अचानक निघून गेल्याने पत्नीसह मुले उघड्यावर आली. त्यांच्यावर आर्थिक अडचणींचे डोंगर कोसळले. या कर्मचाऱ्यांची मुले अनुकंपा तत्त्वावर पोलीस दलात भरती होण्यास पात्र ठरले असतानाही प्रक्रियेस मोठा विलंब झाला; मात्र विद्यमान जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी पुढाकार घेऊन भरती प्रक्रिया राबवत १८ मुलांना आज, २२ जानेवारी रोजी नियुक्तीपत्र प्रदान केले. याप्रसंगी नेत्रदिपक सत्कार सोहळा घेण्यात आला.



पोलीस विभागात कर्तव्य बजावत असताना मृत पावलेल्या पोलिसांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर जलदगतीने नियुक्ती देणेबाबत शासनाचे आदेश प्राप्त झाले होते. त्याची तत्काळ दखल घेत पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून अनुकंपा नियुक्तीसंबंधीच्या प्रमाणित कार्यपध्दतीनुसार पोलीस शिपाई पदावर १५ आणि कनिष्ठ श्रेणी लिपीक या पदावर ३ अशा एकूण १८ उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात आली. २२ जानेवारी रोजी वाशिम अनुकंपा तत्त्वावर नव्याने रूजू झालेल्या नवनियुक्त पोलीस अंमलदार तसेच लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी संबंधितांच्या कुटुंबातील सदस्यांनी हजेरी लावली. पोलीस अधीक्षकांनी त्यांच्याशी सवांद साधला.

### जनतेच्या रक्षणासाठी पुढाकार घ्या-बच्चन सिंह

अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती मिळालेल्या मुलांनी समाजात पोलीस दलाची मान उंचावेल, असे कार्य करावे. कर्तव्य पार पाडताना पालकांचे निधन झाले. त्यांचे वारसदार म्हणून जनतेच्या रक्षणासाठी सदैव पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी केले.

कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे, परविक्षाधिन सहायक पोलीस अधीक्षक महेक स्वामी, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह) सुनील हुड, पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, राखीव पोलीस निरीक्षक पवार, प्रमुख लिपीक राजेश ठाकरे, रतन राठोड व इतर पोलीस अधिकारी, अंमलदार उपस्थित होते.

Hello Washim
Page No. 2 Jan 23, 2022
Powered by: erelego.com